# अर्धमागधी – प्राकृत
## इयत्ता १० वी
## प्रस्तावित आराखड्यानुसार कृतिपत्रिका (संपूर्ण)

वेळ – ३ तास  गुण – १००

**प्रस्तावना** :

भाषा हे अभिव्यक्तीचे आणि समाज व्यवहाराचे एक प्रभावी माध्यम आहे. ज्या ध्वनिचिन्हामार्फत आपण परस्परांशी विचार–विनिमय करतो त्यालाच भाषा म्हणून संबोधले जाते. या भाषेच्या माध्यमातूनच मानवी जीवनाची मूल्ये मौखिक परंपरेने जपलेली दिसून येतात.

प्रत्येक भाषेला स्वतःचा एक इतिहास असतो. स्वतःची अशी एक शक्तीही असते. त्या शक्तिला कोणी कितीही आव्हाने दिली तरीही तिचे श्रेष्ठत्त्व कोणीही पुसून टाकू शकत नाही. तिचे श्रेष्ठत्त्व नाकारता येत नाही.

दुसरे म्हणजे कोणतीही भाषा शुद्ध किंवा अशुद्धही नसते. कारण आपले विचार, आपल्या मनातील भाव इतरांना नेमकेपणाने समजाविणे हेच भाषेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

प्रत्येक भाषेवर त्या त्या प्रदेशातील त्या त्या समाजातील रूढीपरंपरांचा, संस्कृतीचा जसा प्रभाव असतो. तसा राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच भौगोलिक स्थितीचाही ठसा उमटलेला असतो.

भारतात प्राचीन काळात भाषेचे दोनच प्रमुख प्रकार होते. त्यातील पहिला प्रकार म्हणजे बहुजन समाजासी निघडीत असलेली प्राकृत भाषा होय. या प्राकृत भाषेला देशीभाषा, ग्रामीण भाषा, बोलीभाषा अशा अनेक नावाने संबोधले जाते. भाषेचा दुसरा प्रकार म्हणजे संस्कृत भाषा होय.

सामान्य लोकांचे दुःख निवारण्याची खरी तळमळ असलेल्या भ. महावीर, भ. बुद्ध, महात्मा बसवेश्वर, चक्रधर, ज्ञानदेव, तुकाराम इत्यादिसारख्या अनेक थोर महात्म्यांनी सामान्यांच्या बोलीभाषेचा म्हणजेच या प्राकृत भाषेचा आधार घेतला. कारण सामाजातील सर्व सामान्य असलेला समाजही प्राकृत भाषाच बोलत होता. या प्राकृत भाषेचे श्रेष्ठत्त्व जाणूनच भास, कालिदास, शुद्रक इत्यादि श्रेष्ठ नाटककारांनी आपल्या नाट्यग्रंथात या प्राकृत भाषेचा अंतर्भाव केलेला दिसून येतो.

परंतु या प्राकृत भाषेविषयी मनात द्वेष भाव असणार काही विद्वानांनी प्राचीन नाट्यग्रंथातील प्राकृत संभाषणाच्या जागी संस्कृत संभाषणे घालून मुळात असलेले नाट्यसाहित्यातील विविध प्राकृत भाषेतील सौंदर्य नष्ट करुन टाकलेले दिसून येते. हे मोठे दुर्दैव होय. कारण भविष्यात जे कोणी प्राचीन भारतीय भाषांचे अभ्यासक/संशोधनक तुलनात्मक अध्ययन करु इच्छतील त्यांच्या मार्गातील हा मोठा अडथळा ठरेल असे मला वाटते.

कारण संस्कृत–प्राकृत–पाली या प्राचीन भारतीय भाषांपैकी कोणत्याही एका भाषेच्या अध्ययनाने संपूर्ण भारतीय संस्कृतीचा किंवा समाज जीवनाचा खरा परिचय होणे कठीण असते. म्हणूनच प्राकृत–पाली–संस्कृत या तीन भाषांचा अभ्यास होणे गरजेच आहे. हे लक्षात घेवून आपल्या शासनाने माध्यमिक, उच्चमाध्यमिक तसेच महाविद्यालय स्तरावरही या तिन्ही भाषेच्या अभ्यासाची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

एकाच प्रकाराची भाषा बोलणाऱ्या व्यक्तींमध्ये त्या त्या स्थानिक पातळीनुसार, उच्चार पद्धतीनुसार तसेच अज्ञानाने, परप्रांतीय भाषिकांच्या संपर्कामुळे त्या भाषेत परिवर्तन घडून थोडाफार वेगळेपणा जाणवू लागतो. त्याप्रमाणे प्राकृतभाषेतही महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, पैशाची, चुलीकापैशाची, अपभ्रंश असे जवळ जवळ १८ भाषिक भेद असलेले दिसून येतात. त्या त्या प्राकृत भाषेचा वेगळेपणा दाखविणारी वैशिष्ट्ये वररुची, हेमचंद्र इत्यादी अनेक विद्वानांनी आपल्या व्याकरण ग्रंथात दिलेली आहेत.

भारताच्या उत्तरसीमेपासून द्राविडी भाषां प्रांतापर्यंत जैन आणि बौद्ध प्रचारक ज्या ज्या ठिकणी गेले. त्या त्या ठिकाणच्या प्रादेशिक भाषेबरोबर या प्राकृत भाषेत आपल्या धर्माची तत्त्वे उपदेशू लागले. त्यामुळे त्या त्या स्थानिक भाषिकांनी प्राकृतातील काही सुलभ शब्दांचा स्वीकार केला तर प्राकृत भाषेनेही त्या त्या भागातील भाषेतील सुलभ शब्दांचा स्वीकार केला.त्यामुळे ही प्राकृत भाषा भारताच्या कानाकोपऱ्यात सहजपणे पोहोचली एवढेच नव्हे तर ह्या प्राकृत भाषेला राजभाषा म्हणूनही काही राजांनी सन्मानित केले. सम्राट अशोक, सम्राट खारवेल यांनी तर या प्राकृत भाषेत प्रथम शिलालेख कोरून या प्राकृत भाषेला लिखित स्वरुप दिले. त्यानंतर सातवाहन वंशीय राजांचा काळ म्हणजे या भाषेचा सुवर्ण काळच मानला जातो.

जैनधर्मिय आचार्यांनी या प्राकृत भाषेत १२ अंगग्रंथ, १२ उपांगे, १० प्रकिर्णके, ६ छेदसूत्रे, ४ मूलसूत्रे असे एकूण ४४ आगम ग्रंथ लिहिले आहेत. या आगम ग्रंथावर निर्युक्ति, भाष्य, चूर्णी, टीका, विवरणादि विपुल साहित्य असलेले दिसून येते. या धार्मिक ग्रंथाशिवाय महाकाव्ये, खंडकाव्ये, मुक्तक काव्ये कथा, नाट्यसाहित्य, व्याकरण ग्रंथ, शब्दकोष असे विपूल प्राकृत साहित्य असलेले दिसून येते. या प्राकृत साहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय होवून आजच्या वर्तमान काळातही प्राकृत भाषेचे अभ्यासक, संशोधक निर्माण व्हावेत म्हणून कृतिपत्रिकेचा अवलंब करणयात येत आहे.

आजपर्यंत आपण पाठांतर आणि स्मरण शक्तीच्या आधारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन करत होतो. पाठांतरीत केले ज्ञान सखोल ज्ञान तर असत नाहीच शिवाय हे पाठांतरीत केले ज्ञान विस्मरणात जाण्याचा धोकाही असतो. दुसरे म्हणजे एखाद्यास पाठांतर करणे शक्य झाले नाही. अशा व्यक्तीसाठी इतर मूल्यमापन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे असते. ती मूल्यमापन पद्धत म्हणजे कृतीशीलता होय.

विद्यार्थी ज्या भागात राहातो तेथील व्यावहारिक जीवनातील त्या भाषेचे महत्त्व लक्षात घेवून विद्यार्थ्यांचा भाषिक होणे महत्त्वाचे असते.ह्या भाषिक विकासाबरोबर त्या विद्यार्थ्यास अध्ययनाचा आनंद मिळणेही तेवढेच महत्वाचे असते. हे लक्षात घेवूनच प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलून या कृतिपत्रिकेच्या आधारे विद्यार्थ्यांचे, मूल्यमापन करण्यात येणार आहे.

पाठांतर किंवा घोकंपट्टीवर आधारित ज्ञानामध्ये संपूर्ण पाठाचा किंवा संपूर्ण अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यासही होत नाही. त्यामुळे लेखन करणे किंवा संभाषण करणे कठीण होते. त्यामुळे लेखन करणे किंवा संभाषण करणे कठीण होते. त्यामुळे भाषिक कौशल्यही प्राप्त होत नाही. त्यामुळे भाषिक अभ्यास, वाचन लेखन, उपक्रम, व्याकरण, इ. सर्व घटकांचा अभ्यास या कृतीच्या माध्यमातून केल्याने विद्यार्थ्यांस भाषिक कौशल्य प्राप्त होण्यास मदत होते. म्हणूनच कृतिपत्रिकेचा अवलंब केला जात आहे.

**कृतिपुस्तिकेचे स्वरुप –**

पाठ्यपुस्तकावर आधारित वेगवेगळ्या कृती कशा करता येतील यासाठी काही प्रातिनिधीक मार्गदर्शक कृती संच म्हणून कृतिपत्रिका तयार करण्यात आलेली आहे. तरीही त्यामध्ये काही आवश्यकता असल्यास शिक्षकांनी थोडी फार भर घालून विद्यार्थ्यांच्याकडून संपूर्ण पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करुन घ्यावा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती कौशल्याचा होत राहिल. त्यासाठी पाठ्यपुस्तकामधील स्वाध्याय पाठाखालील स्वाध्याय, व्याकरण, उपक्रमादि ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

१) कृतिपत्रिकेतील प्रश्नांचे स्वरूप वस्तुनिष्ठ, लघुत्तरी असावे.
२) कृतिपत्रिकेतील प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारास चिंतनास कल्पकतेस, स्वानुभवास, स्वमत प्रकटीकरणास तसेच प्रत्यक्ष कृतीशीलतेस प्राध्यान्य राहिल.
३) व्याकरण विभागात उपयोजन व कौशल्याधिष्ठित अधिक अपेक्षित आहे.
४) उपयोजित लेखनातील प्रत्येक घटक ५ गुणासाठी असावेत.
५) पाठ्यपुस्ताकाबरोबर शालाबाह्य अनुभव, निरीक्षण, अवांतर वाचन इ. स वाव देण्यावर भर राहिल.

**कृतिंची संक्षिप्त यादी**

१) आकृतिबंध टेबल तयार करणे
२) शब्दजाल पूर्ण करणे
३) संबंध दर्शविणे (जोड्या जुळविणे)
४) घटनेनुसार क्रम लावणे
५) वाक्यांचा क्रम लावणे
६) तक्ते तयार करणे
७) संकल्पना चित्रण करणे
८) समानार्थी/विरुद्धार्थी शब्द देणे
९) वाक्यात उपयोग
१०) रिकाम्या जागी पर्यायी योग्य शब्दांची निवड
११) पाठातील वाक्यप्रचारांचा संग्रह करणे.
१२) शब्दार्थ/ शब्दसंग्रह करणे

## इयत्ता दहावी 'अर्धमागधी–प्रदीप' (संपूर्ण)

## नमुना कृतिपत्रिका

| घटकनिहाय गुणविभागणी | | |
|---|---|---|
| क्र. | घटक | गुण |
| 1 | गद्य | 40 |
| 2 | पद्य | 20 |
| 3 | स्थूलवाचन | 05 |
| 4 | लेखन | 20 |
| 5 | व्याकरण | 15 |
| | एकूण | 100 गुण |

## कृतिपत्रिका आराखडा

## इयत्ता दहावी 'अर्धमागधी–प्रदीप'(संपुर्ण)

**विभाग 1 गद्य** **एकूण गुण : 40**

| | | |
|---|---|---|
| **प्र. 1 (अ)** | **पठित उताऱ्यांचे माध्यम भाषेत भाषांतर करा. (03 पैकी 02 )(शब्दसंख्या 50 ते 60)** | **06** |
| | **(06 गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी)** | |
| | (1) ज्ञान कृती | 02 गुण |
| | (2) आकलन कृती | 02 गुण |
| | (3) उपयोजन कृती | 02 गुण |
| **(ब)** | **अपठित उताऱ्यांचे माध्यम भाषेत भाषांतर करा. (03 पैकी 02 )(शब्दसंख्या 40 ते 50)** | **05** |
| | **(05 गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी)** | |
| | (1) ज्ञान कृती | 02 गुण |
| | (2) आकलन कृती | 01 गुण |
| | (3) उपयोजन कृती | 02 गुण |
| **(क)** | **पठित गद्य पाठावर आधारित (पाठ्यपुस्तकातील कोणताही एक उतारा देणे.)** | **07** |
| | **(त्यावर आधारित 07 गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी)** | |
| | (1) आकृतीबंध पूर्ण करा. | 02 गुण |
| | (2) योग्य पर्याय निवडा. | 02 गुण |
| | (3) घटनाक्रमानुसार क्रम लावा. | 02 गुण |
| | (4) समानार्थी शब्द लिहा. | 01 गुण |
| **(ड)** | **पठित गद्यावर आधारित कंसात दिलेल्या सूचनेनुसार कृती** | **07** |
| | (1) चूक की बरोबर लिहा. | 02 गुण |
| | (2) आकृतीबंध पूर्ण करा. | 02 गुण |
| | (3) जोड्या जुळवा. | 02 गुण |
| | (4) चौकट पूर्ण करा. | 01 गुण |

**(इ) माध्यम भाषेत कृती करा. स्वमत व अभिव्यक्ती** **04**

**खालीलपैकी किमान 02 कृती अपेक्षित (कोणतेही)**

उदा. (1) घटना व परिणाम – आकलन, उपयोजन, कार्यकारणभाव

(2) एका वाक्यात उत्तर – ज्ञान, आकलन

(3) कारणे लिहा. – कार्यकारण, तार्किक विचार, आकलन

(4) कोण ते लिहा. – ज्ञान

(5) स्पष्टीकरण लिहा. – आकलन, उपयोजन, सर्जनशीलता

## विभाग 2 – पद्य गुण : 20

**प्र. 2 (अ) पठित पद्य उताऱ्याचे माध्यम भाषेत भाषांतर करा. (05 पैकी 03 )** 09 गुण

(**03 गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी)** **03 गुण**

(1) आकलन कृती 01 गुण

(2) उपयोजन कृती 02 गुण

**(ब) पठित पद्य (पाठ्यपुस्तकातील दिलेल्या कोणत्याही तीन कवितांची शीर्षक देणे किंवा कोणत्याही तीन कवितेतील तीन गाथा देणे.)**

(1) कवितेची ओळ पूर्ण करा. 02 गुण

(2) सरळ अर्थ लिहा. 02 गुण

(3) योग्य गाथा ओळखा. 02 गुण

(4) रूपे ओळखा. 01 गुण

**(क) पठित पद्य पाठावर माध्यम भाषेत कृती करा. (कोणत्याही दोन कवितेतील दोन गाथा देणे)** 04 गुण

(**04 गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी)** **03 गुण**

(1) कवितेच्या अर्थावरून कवितेच्या ओळी शोधा. 02 गुण

आकलन कृती – 01 गुण

उपयोजन कृती – 01 गुण

(2) विचार विस्तार लिहा. 02 गुण

ज्ञान कृती व आकलन कृती – 01 गुण

सर्जनशीलता – 01 गुण

## विभाग 3 – स्थूलवाचन गुण : 05

**प्र. 3 गद्य**

**(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित)**

**पाठाचा बोध**

**शालाबाह्य जीवनाशी सांगड घालणारा आशय**

**नैतिक मूल्य**

**जीवन कौशल्य यांवर आधारित 03 कृती देऊन त्यापैकी 02 सोडिविणे अपेक्षित**

**किंवा**

**पद्य**

**(1) विचार सौंदर्य**

**(2) भाव सौंदर्य**

**(3) अर्थ सौंदर्य**

**(4) रस ग्रहण**

**यापैकी कोणत्याही दोन घटकाच्या आधारे दोन कृति अपेक्षित आहे.**

## विभाग 4 – उपयोजित लेखन गुण : 20

**प्र. 4 (अ) विभाग लेखन कौशल्य (60 ते 70 शब्द)**

(1) निबंध लेखन (04 पैकी 01 ) 10 गुण

(कोणत्याही 4 घटकावर कृती देणे त्यापैकी कोणत्याही एका घटकावर लेखन अपेक्षित)

**किंवा**

(1) अर्धमागधी–प्राकृत भाषेत भाषांतर करा. (07 पैकी 05 ) 10 गुण

**(ब) कथापूर्ती (कंसातील योग्य शब्द निवडून कथापूर्ण करा.)** 10

## विभाग 5 – व्याकरण गुण : 15

प्र. 5

(1) वर्ण विषयक बदल लिहा.(07 पैकी 05 ) 05 गुण

(2) रूपे ओळखा. (07 पैकी 05 ) 05 गुण

(3) संख्यावाचक शब्द लिहा. (07 पैकी 05 ) 05 गुण

***

## इ. १० वी.
## कृतिपत्रिका स्वरुप
## विषय – अर्धमागधी / प्राकृत (संपूर्ण)

**दिनांक :**

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :–** (1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.
(2) प्रश्न क्र. 7 चे उत्तर अर्धमागधी प्राकृत भाषेत लिहा.
(3) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

### विभाग 1– गद्य

**प्र. 1 (अ) कोणत्याही दोन पठित गद्य उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा.** **10**

(1)
(2)
(3)

**(ब) कोणत्याही दोन अपठित गद्य उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा.** **12**

(1)
(2)
(3)

**(क) पठित गद्यपाठावर आधारित कोणताही एक उतारा देणे व त्यावर आधारित कृती करणे.** **07**

(1) आकृतीबंध पूर्ण करा. 02 गुण

(2) योग्य पर्याय निवडा. 02 गुण

(3) घटनानुसार क्रम लावा. 02 गुण

(4) समानार्थी शब्द लिहा. 01 गुण

**(ड) पठित गद्यपाठावर आधारित कंसात दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **07**

(1) चूक की बरोबर ते लिहा. 02 गुण

(2) आकृतीबंध पूर्ण करा. 02 गुण

(3) योग्य जोड्या जुळवा. 02 गुण

(4) चौकट पूर्ण करा. 01 गुण

**प्र. 1 (इ) खालीलपैकी कोणत्याही दोनांची माध्यम भाषेत कृती करा.** **04**

(1) घटना व परिणाम

(2) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(3) कारणे लिहा.

(4) कोण ते लिहा.

(5) स्पष्टीकरण करा.

**विभाग 2**

**प्र. 2 (अ) कोणत्याही तीन पठित पद्य उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमात भाषांतर करा.** **09**

(1)

(2)

(3)

(4)

(5)

**प्र. 2 (ब) खालील पठित पद्यपाठातील गाथा वाचून कृती करा.** **09**

(1) अपूर्ण ओळ पूर्ण करा. 02 गुण

(2) अर्थानुसार गाथा ओळखा. 03 गुण

(3) गाथा आशय (तात्पर्य) स्पष्ट करा. 04 गुण

**प्र. 2 (क) पठित पद्य पाठावर माध्यम भाषेत कृती करा.** **02**

(1) अर्थानुसार कवितेची ओळ शोधा. 02 गुण

**विभाग 3**

**प्र. 3(अ) स्थूलवाचन गद्यपाठावर आधारित कृती करा.** **05**

(1) 03 गुण

(2) 02 गुण

**किंवा**

**स्थूलवाचन पद्यपाठावर आधारित कृती करा.** **05**

(1) 03 गुण

(2) 02 गुण

**विभाग 4**

**प्र. 4(अ) खालीलपैकी एकावर अर्धमागधी प्राकृत भाषेत निबंध लिहा.** **10**

**किंवा**

**कोणत्याही पाच वाक्यांचे अर्धमागधी प्राकृत भाषेत भाषांतर करा.**

i.
ii.
iii.
iv.
v.
vi.
vii.

**(ब) कंसातील योग्य शब्द लिहून कथा पूर्ण करा.** **10**

**विभाग 5**

**प्र. 5 व्याकरणावर आधारित योग्य कृती करा.** **15**

(1) वर्ण विषयक बदल लिहा. 5/7 05 गुण

(2) रूपे ओळखा. 5/7 05 गुण

(3) संख्यावाचक शब्द लिहा. 5/7 05 गुण

***

## इ. १० वी.
## कृतिपत्रिका 1
## विषय – अर्धमागधी – प्रदीप (संपूर्ण)

**दिनांक :**

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :–** (1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.
(2) प्रश्न क्र. 4 चे उत्तर अर्धमागधी प्राकृत भाषेत लिहा.
(3) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

### विभाग 1– गद्य

**प्र. 1 (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन पठित उताऱ्यांचे माध्यम भाषेत भाषांतर करा.** 12

(१) कणिट्ठपुत्तो, सोहणं कज्जं किं ? ति गवेसंतो एगया नयराओ बाहिरं गओ । तइआ तत्थ सरोवरम्मि पडियं बुड्डंतं जणं पासित्ता सिग्घयरं तत्थ गओ । जलम्मि पडिऊण तस्स उध्दरणट्ठं पयासं कुणेइ, अयं को अत्थि त्ति वियारिऊण तं पुरिसं सम्मं पासेइ । तेण णायं – इमो मम सत्तू वट्टर । एवं णच्चा वि बुड्डतं तं रक्खेउं विचिंतेइ । कट्ठेण तं जलाओ बाहिरं निक्कासेइ आसासेइ य । सो वि सत्तू जीवियदाणाओ तस्स मित्तत्तणं संपत्तो ।

(२) कम्मि गामे एगो निध्दणो निब्भग्गो पुरिसो आसी । सो कट्ठेण जीवणं निव्वहेइ । एगया सो वणम्मि गओ, तत्थ एगो विज्जाहरो अ विमाणेण गच्छंति । सो निध्दणो तेहिं दंपइहि दिट्ठो विज्जाहरी तं निध्दणं दट्ठूण नियभत्तारं कहेइ – हे पिय ! एसो निध्दणो अम्हाणं दिट्ठिपहम्मि जइ समागाओ तया एसा अवस्सं सुहं पावियव्वो । विज्जाहरो कहेइ – एसो निध्दणो निब्भग्गो अत्थि । दिण्णधणो वि असुह कम्मोदएण सो निध्दणो होज्जा ।

(३) कमेण पत्तो नियघरस्स अंगणो । अवमाणं असहिऊण उच्चसरेण कहिउं लग्गो –जणणि ! वइरिणी । किं ण तए पढमं व कुकम्मं कुणंतो वारिओ ? एवमाइ विविहं विलवंतो समारोविओ सूलाए । अट्ट–रूद्द–झाणेहिं मरिऊण समुप्पणो नरए । जइ जणणीए बालवए एव निवारिओ होन्तो ता जोव्वणे एवंपयारेरण ण मारिओ होन्तो ।

**प्र. 1 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका अपठित उताऱ्यांचे माध्यम भाषेत भाषांतर करा.** 10

(१) कम्मि वि नयरे एगो कुंभारो आसी । तस्स भज्जा भद्दा । तीए नरिंद – महिसीए सह मेत्ती–भावो आसी । बे वि परोप्पराण सुह– दुक्खाणं वत्तं सया एक्कमेक्काणं पुच्छंति । राय–महिसीए सहित्तणेण कुंभयारी भद्दा लोगाणं आयरं सम्माण च पावेइ । कुंभगार – भज्जाए एगा गद्द ही अईव वल्लहा आसी । गद्दहीए पुत्तो जायइ । सो अईव सय –रूवा । तीए तस्सुवरिं बहु–नेहो अत्थि । तओ तस्स नामं मयणु त्ति दिण्णं ।

(२) कत्थ वि गामे एगो पुरोहिओ आसी । तस्स एगो पुत्तो, पंच कन्नागाओ संति । तस्स चउरो कन्नगाओ विवाहियाओ । कयाई पंचमी – कन्नगाओ य आगया । पुण्णे विवाहे जामायरेहिं विणा सव्वे संबंधिणो निय–निय घरेसु गया । जामायरा भोयण लुध्दा गेहे गंतु न इच्छंति । खज्ज–रस–लुध्दा ते परस्परं चिंतति, 'ससुर–गिह–निवासो सोहणो सव्व लोए एवं चिंतिऊण एगाए भित्तीए एसा सुत्ती लिहिया ।

**प्र. 1 (क) खालील दिलेला उतारा वाचून कृती करा.** 07

एगम्मि नयरे एगो सिरिमंतो सेट्ठी परिवसइ । तस्स तिण्णि पुत्ता संति । एगया वुड्ढत्तणम्मि तेण नियदव्वस्स भाग- तिगं काऊण पुत्ताणं दिण्णं । तस्स पासाम्मि एगं महामुल्लं रयणं अत्थि, तेण, अप्पणो पुत्ताणं को धम्मिओ त्ति जाणणट्ठं कहियं जो सोहणं कज्ज कुणेज्जा, तस्स एयं रयणं दाहिस्सं ।

एवं सोच्चा जेट्ठो पुत्तो अडसट्ठिं तित्थजत्ताओ किच्चा, तत्थ नियधणं वइऊण घरम्मि समागओ । पिउस्स वुत्तं - मए एयं सोहणं कज्ज कयं । बीओ तइअ पुत्तेण सरोवरम्मि बुड्डत्तं जणं पासिऊण सिग्धयरं उध्दरण करेइ । दीण - दुहिय - अणाहणं भोयणं देइ ।

(1) वरील उतारा वाचून प्राकृत शब्द शोधा. 02 गुण

(i) श्रीमंत ................

(ii) रत्न ................

(2) पुढीलपैकी एका शब्दाची अर्धमागधीत समानार्थी शब्द लिहा. 01 गुण

(i) सुय ................

(ii) दव्व ................

(3) योग्य पर्याय निवडा. 02 गुण

(i) श्रीमंत श्रेष्ठीस ................ मुले होती. (दोन, तीन)

(ii) श्रेष्ठीच्या ................ पुत्राने दीनदुक्खीतांना अन्नदान केले. (प्रथम, द्वितीय)

(4) कृती कोणाचे ते लिहा. 02 गुण

(i) अडुसष्ट तीर्थक्षेत्रांना जावून आलेला ................

(ii) बुडणाऱ्या मुलास वाचवून जीवन देणारा ................

**प्र. 1 (ड) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** 07

**(1) चूक की बरोबर ते लिहा.** **02 गुण**

(i) विद्याधर आणि विद्याधरी आकाशमार्गाने भ्रमण करत होते.

(ii) अशुभ कर्माच्या उदयाने धनाची प्राप्ती होते.

**(2) आकृतीबंध पूर्ण करा.** **02 गुण**

(i) तंटामुक्त गाव शोधणारा ................

(ii) जैन परंपरेतील ध्यानाचा एक प्रकार ................

**(3) योग्य जोडया जुळवा** **02 गुण**

| **अ** | **ब** |
|---|---|
| i. महावीर वाणी | 1. सत्याग्रही |
| ii. महात्मा गांधी | 2. अर्धमागधी/प्राकृतभाषा |
| | 3. हिंसावादी |

**(4) गटात न बसणारा शब्द ओळखा.** **01 गुण**

राया, निव, तणय

**प्र. 1 (इ) माध्यम भाषेत कृती करा. (कोणत्याही एकाचे)** 04

(i) महात्मा गांधीजींचे अहिंसेविषयीचे विचार

(ii) भगवान महावीरांनी वनस्पती आणि माणसांची केलेली तुलना आपल्या शब्दात लिहा.

## विभाग 2

**प्र. 2 (अ) खालीलपैकी कोणत्याही तीन पठित पद्य उताऱ्यांचे माध्यम भाषेत भाषांतर करा.** 09 गुण

(१) जे जे गुणिणो जे जे अचाइणो, जे विअड्ढविण्णाणा ।
दारिद्द ! रे विअक्खण ! ताण तुमं साणुराओ सि ।।

(२) इह आसि वसंतपुरे परोप्परं नेह - निब्भरा मित्ता ।
खत्तिय-माहण-वणिय-सुवण्णयारा त्ति चत्तारी ।।

(३) जग्गइ चउत्थ-जामे सुवण्णयारो, सुवण्ण पुरिसं तं ।
दट्ठुण विम्हिय मणो भणइ, इमं एस अत्थो ति ।।

(४) इह अत्थि वसंतपुरं नगरं तत्थासि निध्दसो नाम ।
घिज्जाइओ महेला, लीलानिलओ सुहा तस्स ।।

(५) जणणीए चिंतिय मज्झ दुहियरो, सुत्थिया कहं होज्जा ।
जम्हा पइ-परिणामे, अन्नाए ववहरंतीओ ।

**(ब) I. पठित पद्यातील कोणत्याही एका गाथेची ओळ पूर्ण करा.** 02 गुण

(१) विस-मिस्सं भत्तं भुंजिऊण दिय-खत्तिया वि ................ ।

(२) सव्वे जीवा वि इच्छंति ................ न मरिज्जिउं ।

**II.कोणत्याही एकाचा अर्थ लिहा.** 03 गुण

(१) जीववहो अप्पवहो , जीवदया अप्पणो दया होइ ।
ता सव्व जीवहिंसा, परिचत्ता अत्तकामेहि ।।

(२) रयणीइ तस्स बाहिं उज्जाणे तरू-तलाम्मि पासुत्ता ।
पढम-पहरम्मि चिट्ठइ जग्गंतो खत्तिओ तत्थ ।।

**III. कोणत्याही एका गाथेचा संदर्भ देवून तात्पर्य स्पष्ट करा.** 04 गुण

(1) मज्जेण पारो अवसो, कुणेइ कम्माणि णिंदणिज्जाइं ।
इहलीए परलोए, अणुहवइ अणंतचं दुक्खं ।।

(2) इथ तोसिय तच्चिंत, भणिया धूया जहेव देवस्स ।
तह वहिज्जासि, न अन्नहा, इमो तुह पियकसे त्ति ।।

**(क) अर्थावरून कवितेच्या ओळी शोधा.** 02 गुण

अर्थ - (1) श्रीमंत रसिकाची क्रीडा, प्रियेचा रूसवा, समर्थाची क्षमा, जाणत्याचे'बोलणे व अजाणत्याचे मौन, हयाच गोष्टी केवळ शोभून दिसतात.

गाथा - i. जे जे गुणिणो जे जे अचाइणो, जे विअड्ढविण्णाणा ।
दारिद्द ! रे विअक्सखण ! ताण तुमं साणुराओ सि ।।

ii. छज्जइ पहुस्स ललिअं, पिआइ माणो, खमा समत्थस्स ।
जाणंत अ भणिअं भोणं च अआणमाणस्स ।।

## विभाग 3 (स्थूल वाचन)

**प्र. 3. कोणाच्या मदतीने पद्मावतीने कनकध्वजाचे रक्षण केले ? का ?** 05 गुण

## किंवा

**नयसार श्रेष्ठीने आपल्या तीन मुलांची परीक्षा कशी घेतली? का?**

## विभाग 4

**प्र. 4 (अ) कोणत्याही एका विषयावर प्राकृत भाषेत निबंध लिहा.** 10

(1) मम देसो

(2) भगवं महावीरो

(3) पाऊसकालो

(4) अत्थो

**अथवा**

**खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे प्राकृतमध्ये रूपांतर करा**

(1) बाण स्वभावतः 'सरळ असतो.

(2) दुसऱ्याला हसू नका.

(3) सज्जनाला नमस्कार

(4) पापकार्याचा धिक्कार असो.

(5) वसंतपूर नावाचे नगर होते.

(6) कमला गाणे गाते.

(7) सुंदरी का रडतेस ?

**प्र. 4 (ब) कंसात दिलेल्या प्राकृत शब्दांच्या आधारे कथा (वाक्ये) पूर्ण करा.** 10

एगया एगो कागो आरामे रूक्खसहाए .......... आसि । तस्य मुहे मंसखंड .......... । एगो सियालो भमंतो तं ..........एइ । सियालेण .......... दिट्ठणे । तं मंसखंड .......... इच्छइ । तओ सो कागस्स .......... लग्गो । सो भणइ, भो कागा, अइमुरूवा तव पायपंखनेत्रचंचू । एएणं वयणेण कागो .......... जाओ ति .......... णायं । पुणो य .......... भणइ, अहो तव महुर वाणि तव .......... सुणिउं मे इच्छा ।

**(अत्थि, आरामे, लहिउं, कागो, उवविट्ठो, पसंसिंउ, सियालेण, संतुहो, महुरगाणं, सो)**

## विभाग 5

**प्र. 5. खालील प्रश्नांची व्याकरणात्मक उत्तरे लिहा.** **15**

(1) कोणत्याही पाचांची रूपे ओळखा. 05 गुण

i. दीसइ ii. मुणिणो iii. गंतूण iv. कहिउं

v. भाविऊण vi. वंदामि vii. हसिस्सइ

(2) संधी सोडवा. (कोणतेही पाच) 05 गुण

i. तहा + अवि ii. कवि + इंद iii. धम्म + अधम्म iv. न + अत्थि

v. जीव + अजीव vi. नर + ईसर vii. एग + एग

(3) अर्धमागधीत प्रतिशब्द (समान अर्थी) शब्द लिहा (कोणतेही पाच) 05 गुण

i. पिया ii. पुत्त iii. नई iv. कमल

v. राया vi. कन्ना vii. नह

***